# ऋ ण नि र्दे श

प्रस्तुत शोधप्रबंध सादर करताना मला कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे. या शोधप्रबंधासाठी डॉ. रामचंद्र मालचंद्र देवस्थळी, प्रपाठक, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी वेळोवेळी मौलिक मार्गदर्शन केलेले आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या परिपूर्तीपाठीमागील असलेले प्रेरणास्थान आणि मानवी जीवनमूल्यांचे साक्षात् अधिष्ठान बनून राहिलेले श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक कै. दलितमित्र, शिक्षण-महर्षि, परमपूज्य डॉ. बापूजी साळुंखे यांचेही आशिर्वाद मला लाभलेले आहेत.

प्रस्तुत शोधप्रबंधासंदर्भात कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबादचे प्राचार्य डी.डी. ससे, वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूरचे प्राचार्य डॉ. के.एस. गुरव, प्रा. एम.बी. वेदांते, प्रा.सी.आर.बी. टोपकर यांनी वेळोवेळी सूचना दिल्या, प्रोत्साहन दिले त्यांचा ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्य समजते.

तासगाव तालुक्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, तसेच इयत्ता ११ वी १२ वीला मराठी अध्यापन करणाऱ्या सर्व अध्यापकांनी प्रस्तुत शोधप्रबंधाची प्रश्नावली भरून देण्यामध्ये मोलाचे सहकार्य केले तसेच मुलाखतीत मनमोकळेपणाने विचार व्यक्त केले त्याबद्दल त्यांचे आभार मानणे माझे परमकर्तव्य ठरते.

सुबक टंकलेखन करून देणारे श्री. कवडे व त्यांचे सहकारी यांचेही मी आभार मानते.

माझे माता-पिता यांनी दिलेल्या सक्रिय प्रोत्साहनाबद्दल आणि ज्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे सहकार्य मला लाभले त्या सर्वांची मी ऋणी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाचा उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी अध्यापनाचा मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात स्तर उंचावण्यासाठी निश्चितपणे चांगला उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

(वर्षा दत्तात्रय ससे)

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : २६।६।९०